Rotary 2020-2021

# southern star ...अवघे धरू सुपंथ

*The official bulletin of Rotary Club of Pune South*

*Year : 51, Vol : 7, January 2021*

**A SMOOTH SEA**

**NEVER MADE**

**A SKILLFUL SAILOR....**

**President :** Rtn. Sudarshan Natu | **Secretary :** Rtn. Manisha Belgaonkar | **Editor :** Rtn. Yogesh Nandurkar

## *Vocational Service Month*
### *Profession as an opportunity to serve*

Rtn. PP Govindrao Patwardhan

Enjoy listening....

Second object of Rotary is "High ethical standards in business and professions; the recognition of the worthiness of all useful occupations; and the dignifying of each Rotarian's occupation as an opportunity to serve society.

Therefore, when one joins Rotary it opens an opportunity to serve society. For the occupations related to health and education liker Doctor or teacher service to society is inherent. However, many wonders how they can serve society through their business, vocation or profession. Take for example a stationery merchant. If your club decides to help economically weaker and needy students by providing them note books and other educational aids. The stationery merchant can make it available at concessional rates through his contacts. By doing so he has served the society.

I remember when I was a President, I floated the idea to design project based on expertise of club members. A member was an electrical contractor. I spoke to him and a project was conceptualised. At that time many electrical kitchen gadgets had become popular. "Safety precautions for household electrical gadgets" was the subject of project. It was organised in housing societies during afternoon time, when women get some leisure time. Our member explained various precautions to be taken not only to avoid mishap but to optimise the use and reduce the bill. An electrical gadget manufacturer sponsored it. It was very successful and earned award for functional literacy.

In recent years the motto is bigger and bolder projects. They are essential for making impact in society. But one must not forget that vocation-based projects are necessary for fulfilling the object of Rotary. What is needed is little imagination.

It reminds me of words of Martin Luther King, Jr.

Everybody can be great, because everybody can serve.

Excerpts from his famous speech are "If you want to be important—wonderful. If you want to be recognized—wonderful. If you want to be great—wonderful. But recognize that he who is greatest among you shall be your servant. That's a new definition of greatness. By giving that definition of greatness, it means that everybody can be great, because everybody can serve. You don't have to have a college degree to serve. You don't have to make your subject and your verb agree to serve. You don't have to know about Plato and Aristotle to serve. You don't have to know Einstein's theory of relativity to serve. You don't have to know the second theory of thermodynamics in physics to serve. You only need a heart full of grace, a soul generated by love. And you can be that servant."

August is Membership month. My appeal to all Rotarians if you know someone who is graceful, a soul full of love, then propose his name for membership whatever may be his vocation. It will open him an opportunity to be great and also unparalleled fellowship.

*This article was originally published in the August 2020 issue. This has been republished on account of the 'Vocational Service Month.'*


- रोटरीनं प्रत्येक महिना विशिष्ट कामासाठी योजला आहे. त्याबद्दल महत्त्व आणि काय करायचं हे सांगणारं पान
- शिवाय रोटरी इंटरनॅशनलबद्दल काही विशेष

तुमचा लेख आवर्जून द्या..
समन्वयक
योगेंद्र नातू / अभिजित देशपांडे

रोटरी

## *New Features of Rotary 3131 App*

District Web Team

We have added a new feature to the mobile app in District Celebration And Club Celebration.

When you click a District OR Club Celebration tile on our mobile app, you will find a list of the Rotarians celebrating their birthday OR wedding anniversary.

After clicking on 'WISH' button, you will find a WhatsApp icon. Now you can send your wishes through the WhatsApp messenger system.

District Web team added this new great feature. I encourage all members to download and install the Rotary 3131 app. If you need any help, we will provide it.

All spouses can download our District mobile app. Your email id will be a user name. You can generate a password using the forgot password link. Please ensure that your name is mentioned on the District website as a spouse. Also, ensure that your correct email address is in the records of the website.

In case you wish to change your email address, then the President of your club can do so.

Android users can download the app from the Play Store. Apple users can download the app via the App Store.

Enjoy new features!

## *Reverse Global Grant Project*

Enjoy listening....

Rotary Club of Pune Metro as a primary Club partnered with RCP South, Central, Pristine, Inspira and RC Khadki participated in a 'Reverse Global Grant' project to help people in the Detroit area to fight against COVID-19. The value of the grant was USD 88,000 and has benefitted 100,000+ people.




The handover function of the reverse global grant was conducted virtually on 15 December 2020. RIPN Jennifer Jones was the Chief Guest for this function.

Our District 3131, Pune Metro and all other participating clubs got mentioned and recognition. RCP Metro received a special mention for initiating this idea and helping to put the global coalition together. Fifteen Clubs and four Districts from three continents were a part of this coalition.

All the speakers (including RIPN Jennifer Jones) really appreciated that clubs from India stepped up to help people in Detroit. Local TV channels and radio stations are likely to carry the story.

The 'Rotarian' published from Chicago will carry the story. Overall, it was a good and fulfilling project and great PI for the Clubs and the District.

Rotary Club to Pune South is proud to be a part of the Reverse Global Grant project.

Enjoy Watching....

## रश्मी उवाच

रो. डीजी रश्मी कुलकर्णी

२२ डिसेंबर २०२०
ऐकण्यासाठी क्लीक करा...

१५ डिसेंबर २०२०
ऐकण्यासाठी क्लीक करा...

९ डिसेंबर २०२०
ऐकण्यासाठी क्लीक करा...

## रोटरी कलागौरव









रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३१च्या 'युथ टीम आणि कल्चरल कमिटी'तर्फे तरुणांसाठी ५ डिसेंबर आणि ६ डिसेंबर रोजी नृत्य आणि गायनाची स्पर्धा घेण्यात आली.

व्हिडिओ इथे पाहा...







- आपला क्लब रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३१ मध्ये येतो.
- डिस्ट्रिक्ट गव्हर्नर रश्मी कुलकर्णी यांचा संवाद
- या डिस्ट्रिक्टमधील विविध प्रोजेक्ट्स, कार्यक्रम
- डिस्ट्रिक्टमधील क्लब्सचे महत्त्वाचे, दखलपात्र असे प्रोजेक्ट्स

## डिस्ट्रिक्ट कनेक्ट

तुमचा लेख आवर्जून द्या...
समन्वयक
योगेंद्र नातू / अभिजित देशपांडे

## AG Visit 2020

Rtn. President Sudarshan Natu

Date - 7 December 2020




AG visit was very successful. Rtn.AG PP Abhay Jabade meticulously checked all the club records as per district guidelines and also took a keen interest in understanding various projects, planning, execution, strategic planning and administrative compliances. He visited the club office and spent two hours in a face to face interaction with President, Secretary, Jt. Secretary, Treasurer, PE & PN before the club assembly. Rtn. AGA Dr.Pramod Velankar accompanied AG and took an active part in the review.

During the Club assembly, all the Avenue Directors briefly described various projects and events carried out in the last five months. Youth avenue chairpersons of Interact, RYLA and ECO club shared activities and plans. Thanks to them.

During the review, AG Abhay Jabde especially appreciated our bulletins and mentioned that he read every bulletin in detail and liked them very much. We have covered RI, District, other clubs information and excellent articles and coverage from our members! He said, "Hats off to Bulletin team under Rtn. Yogesh Nandurkar."

He also appreciated the Program committee for giving excellent programs and complimented Rtn. Mandar Purnapatre for the same! Keep it up.

I would like to thank all the Directors, chairpersons & committee members for good teamwork.

Thanks to the entire club for support and coming forward to contribute to various activities in the current situation.



AG observed some points which need to be addressed & completed before DG visit. I am confident that we will go through a successful DG visit on 21st.

My sincere thanks to Secretary Rtn. Manisha for compiling AG visit data and presenting it and also to Rtn. Abhijit Deshpande our IT officer for his timely help in website updates, snapshots etc. Bulletin information came very handily.

Let's continue this momentum and make the upcoming DG visit memorable and successful.

## श्रद्धांजली सभा

**कै. रो. पीपी विपीन गुजराथी**

(१९५५–२०२०)

दिनांक – १४ डिसेंबर २०२०

'रोटरी क्लब पुणे साऊथ'चे माजी अध्यक्ष विपीन गुजराथी (२०१३–२०१४) यांना ५ डिसेंबर २०२० रोजी देवाज्ञा झाली. कै. विपीन गुजराथी यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी १४ डिसेंबर २०२० रोजी सभा आयोजित करण्यात आली होती. विपीन गुजराथी यांच्या पत्नी विजया गुजराथी, कन्या सायली आणि चिरंजीव कृष्णा असे सगळे गुजराथी कुटुंबीय आणि स्नेही या सभेला उपस्थित होते.

रो. प्रेसिडेंट सुदर्शन नातू यांनी कै. विपीन गुजराथी यांचा थोडक्यात परिचय करून दिला. विपीन गुजराथी वयाच्या तेहतीसाव्या वर्षी रोटेरिअन झाले. तेव्हापासून त्यांचा 'रोटरी क्लब पुणे साऊथ'शी संबंध आहे. त्यांनी अनेक जबाबदाऱ्या यशस्वीपणे पार पाडल्या. रोटरी क्लबच्या प्रत्येक प्रोजेक्टमध्ये त्यांनी झोकून देऊन काम केलं. त्यांच्याबरोबर मला बोर्डावर काम करायची संधी मिळाली. त्यांचे अनेक पैलू कळले. विपीनभाई यांनी क्लबची आर्थिक बाजू उत्तमप्रकारे सांभाळली तसंच प्रोजेक्ट स्पॉन्सरशिपचा पायंडा पाडला. त्यांची बुद्धी अत्यंत कुशाग्र होती तसंच आकलन क्षमता चांगली असल्यानं निर्णयक्षमता सुद्धा उत्तम होती. त्यांनी रोटरी क्लबच्या ट्रस्टवर अनेक वर्षं ट्रस्टी म्हणून काम केलं. त्यांच्याच प्रयत्नांमुळे आपल्या क्लबचं ऑफीस झालं. विपीनजींसोबत त्यांचं पूर्ण कुटुंबसुद्धा

रोटरीच्या कामात सहभागी झालं होतं. रो. प्रेसिडेंट सुदर्शन नातू यांनी श्रद्धांजली वाहताना विपीन गुजराथींबरोबरच्या अशा अनेक आठवणींना उजाळा दिला.

रो. पीडीजी  भाऊसाहेब कुदळे यांनी विपीन गुजराथी यांच्या निधनानं धक्का बसल्याचं सांगतानाच विपीनजी एक उत्तम सल्लागार होते आणि अतिशय समतोल असा सल्ला ते देत असत असं नमूद केलं. समाजासाठी आपण काही देणं लागतो याची जाणीव ठेवून सामाजिक कार्यासाठी कायम पुढाकार घेणारं एक दानशूर व्यक्तीमत्त्व असं म्हणत त्यांनी विपीन गुजराथींबद्दलच्या आपल्या सद्भावना व्यक्त केल्या.

रो. पीडीजी दिपक शिकारपूर यांनी विपीन गुजराथी यांचा उत्साह आणि उर्जा अफलातून होती असं नमूद केलं. ते 'कौन्सिल ऑफ प्रेसिडेंट'चे खजिनदार होते. त्यांनी एक अभिनव संकल्पना मांडून ती तडीस नेली होती. आपला एक जवळचा मित्र गमावल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. विपीन गुजराथी यांच्या स्मृतीप्रित्यर्थ एखादा प्रोजेक्ट करावा अशी कल्पना रो. पीडीजी दिपक यांनी मांडली.

रो. दत्ताजी देवधर यांचा संदेश रो. प्रे. सुदर्शन नातू यांनी वाचून दाखवला. रो. दत्ताजी देवधर यांनी विपीन गुजराथी यांची खेड्यातील लोकांसाठी काहीतरी करण्याची तळमळ प्रशंसनीय होती असं मत व्यक्त केलं. विपीन गुजराथी यांनी पालकत्व घेतलेली 'सुंदर घरकूल' ही स्पर्धा 'विपीन गुजराथी सुंदर घरकूल योजना' या नावानं वेगवेगळ्या खेडेगावांत आयोजित करावी अशी इच्छा त्यांनी व्यक्त केली.

रो. प्रेसिडेंट नॉमिनी संजीव ओगले यांनी विपीन गुजराथी यांना श्रद्धांजली वाहताना त्यांच्या दातृत्वगुणाचा उल्लेख केला. त्यांच्याकडून 'आर्ट ऑफ गिव्हिंग' शिकलो असं संजीव ओगले यांनी सांगितलं. माझ्यासाठी विपीन म्हणजे 'व्हेरी इंपॉर्टंट पर्सन इन माय लाइफ' होता तसंच आपण मोठा भाऊ गमावल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. स्नेहा ओगले यांनी विपीन गुजराथी यांच्याबद्दलच्या भावना एका प्रेझेंटेशनमधून व्यक्त केल्या.

विपीन गुजराथी यांच्याशी व्यक्तीशः ओळख नसतानासुद्धा त्यांनी रो. रश्मी परुलेकर यांची केस इन्कम टॅक्स ट्रिब्युनल समोर मांडल्याचं रो. रश्मी परुलेकर यांनी सांगितलं. विपीन गुजराथी यांनी फी न घेता त्याबदल्यात रोटरीच्या प्रोजेक्टसाठी मदत करायला सांगितलं. प्रत्येक भेटीमध्ये त्यांचा एक वेगळाच पैलू समोर येत गेला. त्यांच्याकडून खूप शिकायला मिळालं असं रो. रश्मी म्हणाल्या. आपण एक वडीलधारी व्यक्ती गमावल्याचं दुःख झाल्याचं त्यांनी सांगितलं.

रो. पीपी राजेंद्र गोसावी यांनी विपीन गुजराथी हा माझा अत्यंत जवळचा मित्र होता असं म्हटलं. त्याच्या निधनानं मी एक दिलदार आणि सच्चा मित्र गमावला. विपीन एक उत्तम सल्लागार होता, त्याच्या व्यवसायात अग्रेसर होता. तो कायम मानवतेच्या हितासाठी तत्पर होता. थायलंडला रोटरी कन्व्हेनशन आणि त्यांच्यासोबतच्या अनेक प्रवासांच्या आठवणी अजूनही लक्षात आहेत अशा भावना त्यांनी व्यक्त केल्या.

रो. पीपी विनयाक देशपांडे यांनी क्लबच्या जागेसाठी विपीन गुजराथी यांच्याशी झालेल्या बोलण्याचा उल्लेख करतानाच ते काम अजूनही अपूर्ण असल्याची खंत व्यक्त केली. ते मला कायम 'व्हीडी' म्हणायचे अशी आठवणही त्यांनी सांगितली.

रो. पीपी शाम कुलकर्णी यांनी विपीन गुजराथींसोबत खूप जुना संबंध असल्याचं नमूद केलं. अनेक विषयांवर आम्ही चर्चा करत असू. आर्थिक विषयाबाबत कोणतीही गोष्ट दुसऱ्याला समजेल अशा सोप्या भाषेत ते मांडायचे. विपीनजींनी मला वेळोवेळी सल्ला दिला. विपीनजी आपल्या सगळ्यांच्या आठवणींमध्ये कायम राहतील असं म्हणून त्यांनी विपीनजींना श्रद्धांजली वाहिली.


रो. आयपीपी अभिजीत यांनी विपीन गुजराथी यांची कामाच्या बाबतीतली शिस्त वाखाणण्याजोगी होती असं सांगितलं. त्यांची सामाजिक जाणीव उच्च दर्जाची होती. ते एक उत्तम पती, पिता आणि मित्र होते. कोरोनाच्या काळात माझ्या व्यवसायाबद्दल मी काळजी करत असल्याचं त्यांना जाणवलं आणि त्यांनी खूप धीर दिला हे मी कधीही विसरू शकणार नाही असं म्हणून त्यांच्या आत्म्याला सद्गती लाभो अशी प्रार्थना केली.

रो. रवींद्र प्रभूणे यांनी सांगितलं की, विपीन गुजराथी अध्यक्ष असताना मी रोटरीचा सभासद झालो. विपीन गुजराथी यांच्यासोबत झालेल्या पहिल्या भेटीची आठवण रो. रवींद्र यांनी सांगितली. दिलखुलासपणा आणि उमदेपणा हे विपीनभाईंचे गुण विशेष भावल्याचंही सांगितलं. गोवा रॅलीमध्ये विपीनभाईंच्या एका शब्दाखातर श्रीकृष्ण चितळे यांनी डायलिसिस मशिनसाठी मदत केल्याचं त्यांनी नमूद केलं. त्यांच्या जाण्यानं निर्माण झालेली पोकळी भरून निघणं अवघड आहे अशा शब्दांत त्यांच्या भावना त्यांनी व्यक्त केल्या.

रो. पीपी विरेन शहा यांनी विपीन गुजराथी यांच्या रुपानं मोठा भाऊ मिळाल्याचं समाधान व्यक्त केलं. कोणत्याही प्रसंगी विपीनजी कायम पाठीशी असायचे. मदत न मागतासुद्धा मदत करायचा त्यांचा स्वभाव होता. त्यांनी लोकांना द्यायला शिकवलं. विपीन गुजराथी यांच्याबद्दलच्या अनेक आठवणी सांगताना रो. पीपी विरेन शहा यांना भावना अनावर झाल्या.

कै. विपीन गुजराथी यांची पुत्री सायली यांनी रोटरी क्लबशी जुळलेले स्नेहबंध आणि सर्व सभासदांनी त्यांच्या कुटुंबाला दिलेला भावनिक आधार यांबद्दल गुजराथी कुटुंबीयांतर्फे आभार मानले. ‘रोटरी क्लब पुणे साऊथ’ ही बाबांची फॅमिली होती असं त्यांनी सांगितलं.

विजया गुजराथी यांनी विपीनजींबद्दलच्या भावना कवितेतून व्यक्त केल्या. या व्हिडीओनंतर सभा समाप्त झाली.




व्हिडिओ इथे पाहा...

# ग्रेट भेट – डीजी व्हिजीट स्पेशल

दिनांक – २१ डिसेंबर २०२०

ऐकण्यासाठी क्लीक करा...




सोमवारी २१ डिसेंबरला रो. डीजी रश्मी कुलकर्णी यांनी क्लबला भेट दिली.

रो. प्रेसिडंट सुदर्शन नातू यांनी रो. डीजी रश्मी कुलकर्णी, रो. एजी अभय जबडे, रो. पीडीजी विनय कुलकर्णी आणि रो. पीडीजी भाऊसाहेब कुदळे या सर्वांचं स्वागत केलं.

रो. प्रेसिडंट सुदर्शन नातू यांनी 'प्रेसिडंट अहवाल' वाचून दाखवला. गेल्या सहा महिन्यांत क्लबतर्फे झालेल्या सर्व उपक्रमांचा आवर्जून उल्लेख करताना उपक्रमांत काम केलेल्या प्रत्येक टीम मेंबरचे त्यांनी आभार मानले. डिस्ट्रिक्टनं आयोजित केलेल्या अनेक उपक्रमांत क्लबचा सहभाग होता. रिव्हर्स ग्लोबल ग्रांटसाठी डिस्ट्रिक्ट ३१३१ कडून भरघोस मदत केली गेली असं रो. प्रेसिडंट सुदर्शन नातू यांनी सांगितलं. गोदान प्रकल्पसुद्धा यशस्वीपणं सुरू आहे. या प्रकल्पासाठी फक्त रोटेरिअन्सच नाही तर बाहेरच्या लोकांनीसुद्धा मदत केल्याचं रो. प्रेसिडंट सुदर्शन नातू यांनी नमूद केलं.

गेल्या सहा महिन्यांचा आढवा घेताना एक गोष्ट जाणवली की, सगळीकडं करोना संसर्ग झाला असला तरी










क्लबच्या सभासदांचा उत्साह अजिबात कमी झालेला नाही. पुढच्या सहा महिन्यांत अजून उत्तम कार्य करू असं आश्वासन देताना रो. प्रेसिडंट सुदर्शन नातू यांनी सगळ्या सभासदांचे आभार मानले.

मेंबरशिप डायरेक्टर रो. विनायक जोशी यांनी नवीन सभासद रो. सुनील अरुण जोशी आणि ॲन सुप्रिया सुनील जोशी यांची थोडक्यात ओळख करून दिली. रो. प्रेसिडंट सुदर्शन नातू यांनी नवीन सभासदांना क्लबची शपथ देऊन त्यांचं रोटरी कुटुंबात स्वागत केलं. रो. डीजी रश्मी कुलकर्णी यांच्या हस्ते त्यांना रोटरी पिन दिली गेली आणि रोटरी किट प्रदान केलं गेलं.

रो. प्रेसिडंट सुदर्शन नातू यांनी डीजी व्हिजीटसाठी क्लबनं तयार केलेलं विशेष बुलेटिन रिलिज करण्यासाठी बुलेटिन कमिटीचे चेअरपर्सन रो. योगेश नांदुरकर यांना स्टेजवर बोलावलं. इ-बुलेटीन क्लबच्या साइटवर सभासदांना वाचण्यासाठी उपलब्ध असल्याचं रो. प्रेसिडंट सुदर्शन नातू यांनी सांगितलं.

फाउंडेशन फेलिसिटेशन्स करण्यासाठी फाउंडेशन डायरेक्टर रो. वीरेंद्र शहा स्टेजवर आले. ज्या सभासदांनी आत्तापर्यंत देणग्या दिल्या त्यांना स्टेजवर बोलावून त्या सभासदांच्याच हस्ते देणगीचे चेक रो. डीजी रश्मी कुलकर्णी यांच्याकडं सुपुर्द केले.

रो. अतूल अत्रे यांनी आभार मानले.

व्हिडिओ इथे पाहा...

दिनांक – २८ डिसेंबर २०२०




आपल्या क्लबची वार्षिक सर्वसाधारण सभा दिनांक २८ डिसेंबर २०२० रोजी होती. मिटींगच्या सुरुवातीस डिस्ट्रिक्ट अवॉर्ड्स सेरेमनीमध्ये आपल्या क्लबला मिळलेल्या भरघोस बक्षिसांबद्दल रो. प्रे. सुदर्शन यांनी रो. पीपी अभिजित जोग आणि ॲन नंदिनी यांचे अभिनंदन केले. रो. पीपी अभिजित यांनी आपल्या क्लबला मिळालेल्या अवॉड्र्सबद्दल थोडक्यात माहिती दिली.

यानंतर नॉमिनेशन कमिटीने मंजूर केलेले पुढील वर्षीचे बोर्ड जाहीर करण्यात आले. ते पुढीलप्रमाणे आहे –

१. Hon Secretary – रो. किरण वेलणकर
२. Hon J. Secretary – रो. आनंद पुरोहीत
३. Hon. Treasurer – रो. जितेंद्र महाजन
४. Director, The Rotary Foundation – रो. श्रीकांत परांजपे
५. Director Membership Committee – रो. योगेश नांदुरकर
६. Director Public Image – रो. दत्ता पाषाणकर
७. Director Service Projects Committee (Community Development) – रो. पीपी सुधांशु गोरे
८. Director Services Projects Committee (Human Development) – रो. पीपी विनायक देशपांडे
९. Director Services Projects Committee (Youth Services) – रो. श्रुती गोरे
१०. President Nominee ( RY 23-24) – रो. रवींद्र प्रभुणे

रो. रवींद्र प्रभुणे यांची प्रेसिडेंट नॉमिनी म्हणून निवड झाल्याबद्दल सर्वांनी त्यांचे अभिनंदन केले.

➢ **क्लबच्या साप्ताहिक सभांचा सभेनुसार गोषवारा**

## साप्ताहिक सभा

**तुमचा लेख आवर्जून द्या...**
**समन्वयक**
**एके / यामिनी पोंक्षे**

# क्लबकारी

## Bhairavi
## District Awards Ceremony







At the District Award Ceremony, our club grabbed whopping 9 awards along with RI citation flag for the work done in the Silver Jubilee year.

Congratulations Rtn. PP Abhijit Jog, Ann Nandini Jog and BOD 2019-20 for the fabulous work done.

A moment of pride and well-deserved recognition for all the members of RCPS.

Below is the list of awards that our club grabbed.

1. Best Club,
2. Best Synergy Activity
3. Impact Creating International Project
4. Innovative happy village service project
5. Highest Contribution to Polio
6. Highest Members Added
7. Best District Events PETS
8. New Club Advisor (Rtn. Vinod Agarwal)
9. Best Spouse (Ann. Nandini Jog)

## Coverage in Rotary News Bulletin December 2020




Rotary Pune South celebrated its Golden Jubilee during the last Rotary year. Numerous projects with long term impact were executed during this year and it was truly a Golden Year under the presidentship of Rtn. Abhijit Joag.

This year has received recognition by being featured in the 'Rotary News' monthly newsletter.







Kindly copy and paste the link below in a web browser to read the article.
https://issuu.com/rotarynews/docs/rotary_news_-_december_2020_lr/s/11390979

## डीजी उवाच

**रो. डीजी रश्मी कुलकर्णी**



ऐकण्यासाठी क्लीक करा...

## अध्यक्षीय मनोगत
## मागे वळून बघताना...

**रो. प्रे. सुदर्शन नातू**

रोटरी क्लब पूणे साऊथच्या सदस्यांना माझ्यातर्फे आणि फर्स्ट लेडी ॲन सुगंधातर्फे नूतन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा आणि २०२१ हे नूतन वर्ष आपल्या सर्वांना मंगलमय, आरोग्यसंपन्न आणि आनंददायी जावो अशी ईश्वराकडं प्रार्थना....

२०२०-२१ या रोटरी वर्षाचे सहा महिने रोटरी क्लब पूणे साऊथने पूर्ण केले. साधारणतः डिसेंबर महिन्यातच आपल्या रोटरी क्लबची डीजी भेटसुद्धा असते. नुकतीच २१ डिसेंबरला ती भेट उत्तमपणे पार पडली. त्यानिमित्तानं मा. रो. डीजी रश्मी कुलकर्णी यांच्यासमोर आपण जुलै २०२० ते डिसेंबर २०२० या रोटरीच्या अर्धवर्षाच्या काळात रोटरी क्लब पूणे साऊथने केलेल्या कामांचा आढावा सादर केला. त्यांनीही आपल्याला उत्तम मार्गदर्शन केलं. रो. पीडीजी विनय कुलकर्णी हेही क्लबमेंबर्सच्या विनंतीला मान देऊन हजर राहिले आणि त्यांनी सदस्यांना मार्गदर्शन केलं. महत्त्वाचं म्हणजे त्यांनी फाउंडेशनला दिलेल्या भरीव डोनेशनबद्दल रोटरी क्लब पूणे साऊथने डीजींच्या हस्ते त्यांचं कौतुक केलं. रोटरी क्लब पूणे साऊथने रो. सुनील अरुण जोशी यांना क्लबचं सदस्यत्व देऊन त्यांचं रोटरी क्लब पूणे साऊथ परिवारात स्वागत केलं.

प्रेसिडेंटच्या कामाचा श्रीगणेशा प्रीपेटसपासून होतो. डिस्ट्रिक्टच्या वेगवेगळ्या इव्हेंट्समधून प्रेसिडेंट आणि नवीन बोर्डाला येणाऱ्या वर्षभराच्या कामाचं नियोजन करण्याचं ट्रेनिंग मिळतं. डिस्ट्रिक्टनं कुठले नवीन प्रोजेक्ट्स आणि इव्हेंट्स प्लॅन केलेले आहेत आणि येणारं वर्ष रोटरी इंटरनॅशनल प्रेसिडेंटनी कसं प्लॅन केलं आहे आणि त्याअनुषंगानं क्लबने कुठले प्रोजेक्ट्स राबवले पाहिजेत या सगळ्याची कल्पना मिळते. त्यादृष्टीनं आपण २०२०-२१ च्या बोर्डाची बांधणी केली. यावर्षी रोटरी क्लब पूणे साऊथची सुवर्णमहोत्सवी पर्व साजरं करून शतकाकडं वाटचाल सुरू होणार होती पण मार्च २०२० उजाडला आणि कोरोनाच्या जागतिक संकटामुळं सर्वच गणितं बदलली. संपूर्ण रोटरी विश्व

बदललं... रोटरी क्लब पूणे साऊथच्या २०१९-२० वर्षातले उर्वरित प्रोजेक्ट्स नवीन पद्धतीनं पूर्ण करावे लागले. सुरुवातीचे काही दिवस सगळं ठप्प झालं; पण डिस्ट्रिक्टमधले सगळे रोटरी क्लब्ज नव्या उमेदीनं कामाला लागले. रोटरी क्लब पूणे साऊथनेही बदलत्या परिस्थितीशी जुळवून घेत काळानुरूप बदल केले, नवीन गोष्टी आत्मसात केल्या आणि उत्साह कायम ठेवत कामाची आखणी केली. सर्वच गोष्टी रोटरी क्लबला नवीन होत्या पण ऑनलाईनच्या माध्यमातून सर्वजण पुन्हा नवीन उमेदीनं कामाला लागले आणि सर्वांनी मिळून नवीन प्लॅन्स तयार केले. आपल्या डिस्ट्रिक्टचे पेट्स आणि डिस्ट्रिक्ट ट्रेनिंग ऑनलाईन पद्धतीनं झालं. वर्षभराच्या प्लॅनींगऐवजी महिना, दोन महिन्यांचं प्लॅनींग होऊ लागलं.

नवीन उत्साही रोटेरिअन्सचं बोर्ड, उत्तम चेअरपर्सन आणि उत्साही कमिटी मेंबर्स यांमुळं रोटरी क्लब पूणे साऊथने आत्तापर्यंत चांगली कामं केली आहेत. कोरोनामुळं रोटरी क्लब पूणे साऊथने परिस्थितीनुसार प्रोजेक्ट्समध्ये बदल केले. कित्येक उत्तम कार्यक्रम ऑनलाईन पद्धतीनं पार पडले. आपण दर बुलेटीनमध्ये या सर्व प्रोजेक्ट्सची माहिती देत असतोच. लॉकडाऊन आज/उद्या संपेल म्हणेपर्यंत वर्ष संपलं; पण अजूनही आपण साप्ताहिक सभा इनपर्सन घेऊ शकत नाही आणि ते केव्हा शक्य होईल हे माहीत नाही. तरीही लवकरच सेवासदन इथे आपण मिटिंग घेऊ शकू अशी आशा करू या.

आपण सर्व काळजी घेऊन काम करत असतानाच आपल्याला दुःखद प्रसंगांनासुद्धा सामोरं जावं लागलं. आपले दोन प्रिय रोटेरिअन मित्र या कोरोनाचे बळी ठरले. हे अत्यंत क्लेशदायक होतं आणि या बातम्या प्रेसिडेंट म्हणून देताना मला अतीव दुःख झालं. आपले पूर्व आणि जेष्ठ सदस्यसुद्धा आपल्यापासून काळानं हिरावून नेले. पुन्हा सर्वांचं पुण्यस्मरण...

२६ डिसेंबरला रोटरी क्लबचा २०१९-२० या वर्षाचा डिस्ट्रिक अॅवॉर्ड डिस्ट्रीब्युशन हा कार्यक्रम साजरा झाला. दरवर्षी हा कार्यक्रम मोठ्या प्रमाणात साजरा होतो पण या वर्षी हा कार्यक्रम २०१९-२०चे प्रेसिडेंट्स, डिस्ट्रिक्ट ऑफिसर्स आणि पीडीजी यांच्या उपस्थितीत संपन्न झाला. अभिमानाची गोष्ट म्हणजे रोटरी क्लब पूणे साऊथला नऊ पारितोषिकंही मिळाली तर अॅन नंदिनी जोगला बेस्ट स्पाऊसचं अॅवॉर्डसुद्धा... आयपीपी रो. अभिजित जोग आणि २०१९-२०चे बोर्ड यांचं खूप खूप कौतुक आणि अभिनंदन.

यावर्षीच्या नॉमिनेशन कमिटीनं २०२०-२१ वर्षाचे बोर्ड आणि मुख्य म्हणजे २०२२-२३ या वर्षासाठी प्रेसिडेंट म्हणून रो. रवींद्र प्रभुणे यांची सार्थ निवड केली आणि रोटरी क्लब पूणे साऊथच्या सर्व सदस्यांनी त्यावर शिक्कामोर्तब केलं. सगळ्या डायरेक्टर्सचं अभिनंदन रो. रवींद्र प्रभुणे आणि अॅन सुनीता प्रभुणे या दोघांचं खास अभिनंदन आणि आभार. आपल्या वार्षिक सभेत रोटरी क्लब पूणे साऊथने रोटरीच्या सर्व बाबी पूर्ण केल्या आहेत.

गेल्या सहा महिन्यात सगळीकडं कोरोना संसर्ग झाला असला तरी रोटरी क्लब पूणे साऊथच्या सदस्यांचा उत्साह अजिबात कमी झालेला नाही. पुढच्या सहा महिन्यात आपण अधिकाधिक कामं पूर्ण करून हे वर्ष उत्तम साजरं करू या. रोटरी क्लब पूणे साऊथच्या सदस्यांनी केलेल्या सहकार्यामुळं आणि त्यांच्या सहभागामुळं आजपर्यंतचं काम शक्य झालं आहे आणि यापुढंही आपण सर्वजण मिळून काम करणार आहोत याची खात्री आहे.

या सरत्या वर्षाला निरोप देऊन नवीन वर्षात, नवीन उमेदीनं प्रवेश करू या...

# गोदान प्रोजेक्ट

**रो. प्रे. सुदर्शन नातू**

ऐकण्यासाठी क्लीक करा...



वेल्हे तालुक्यातल्या पासली गावाजवळच्या गरीब शेतकरी कुटुंबांना जोड उत्पन्नाचं साधन निर्माण करून देऊन त्यांचं दीर्घकालीन राहणीमान वाढवावं असा विचार करून रोटरी क्लब पुणे साऊथच्या सदस्यांनी एक प्रकल्प राबवला. सदस्य गेले काही महिने याची पूर्वतयारी करत होते. प्रत्येक गरजू शेतकरी कुटुंबाला एक गाय दान करून त्यांना या गायीपासुन मिळणारं दूध आणि दूधाचे पदार्थ तसंच शेण, गोमूत्र आणि पुढं वाढणारं गोधन यांमुळं उत्पन्न वाढवण्याच्या दृष्टीनं या प्रोजेक्टमधून मदत होणार आहेच पण त्या कुटुंबातल्या सदस्यांचंही आरोग्य सुधारणार आहे.

रो. माधुरी किरपेकर, फर्स्ट लेडी ॲन सुगंधा नातू, श्री आणि सौ दङ्गीकर यांनी रोटरी क्लब पुणे साऊथतर्फे प्रत्येकी एक गाय दान केली. या मदतीसाठी त्यांचे आभार. रोटरी क्लब पुणे साऊथ एका उत्तम प्रोजेक्टची मुहूर्तमेढ करत आहे.


रोटरी क्लब पुणे साऊथच्या सदस्यांनी या गायी एनडीए रोडवर राहणाऱ्या श्री. वझे गुरुजी यांच्याकडून घेतल्या. १२ डिसेंबरला दुपारी शेनवड इथं राहणाऱ्या तीन लाभार्थींना रोटरी क्लब पुणे साऊथच्या सदस्यांनी त्या गायी हस्तांतरीत केल्या. योगायोगानं त्यादिवशी गोदानासाठी उत्तम मुहूर्तही होता

वेळेअभावी काही मोजक्या सभासदांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम झाला. पूर्वसूचना देता आली नाही याकरता क्षमस्व!

## कै. रो. पीपी विपीन गुजराथींना आदरांजली

**रो. पीपी विरेंद्र शाह कुटुंबीय**

ऐकण्यासाठी क्लीक करा...




रो. पीपी विपीनभाई गुजराथी एक मुलखा वेगळा माणूस... परिपूर्ण व्यक्तिमत्त्व लाभलेला अवलिया.

मित्रांनोऽ आपण सर्वजण रोटरीमध्ये विशेषतः 'पुणे साऊथ' क्लबमध्ये येतो तेव्हा रोटरीबद्दलची माहिती देताना क्लबच्या ज्येष्ठ सभासदांकडून काही वैशिष्ट्यं आणि मूल्यं यांबद्दलची माहिती आवर्जून दिली जाते.

त्यातली ठळक मूल्यं म्हणजे

सर्व्हिस अबव्ह् सेल्फ

सर्व्हिस थ्रू व्होकेशन

गिव्हींग बॅक टू सोसायटी

आणि फोर-वे टेस्ट टू बी प्रॅक्टीस्ड इन पर्सनल अँड प्रोफेशनल लाइफ

वरील सर्व मूल्यं सांगितल्याप्रमाणे जपणारा आणि त्यापुढंही जाऊन सातत्यानं फेलोशिपचं महत्त्व अधोरेखित करणारा हा आपला अवलिया मित्र आज आपल्यात नाही हे सत्य आहे.

विपीननं केवळ आपल्या व्यवसायातच नव्हे तर मित्रगण, परिवार, सामाजिक संस्था अशा सर्व क्षेत्रांत आपल्या निराळ्या कार्यशैलीनं एक विशेष ठसा उमटवला होता.

या व्यतिरिक्त अनेकांना मानसिक, आर्थिक पाठबळ दिलं आणि आपल्या व्यवसायातल्या तसंच वैयक्तिक अनुभवांतून सहज सहाय्य आणि अनमोल मार्गदर्शन केलं जे लोकांसाठी फायदेशीर ठरलं.

अशा अचानक जाण्यानं तो अनेकांना निराधार करून गेला मात्र त्यानं दिलेल्या आधारमुळं तो कायम सुवर्णस्मृतीत राहील.

त्याच्या अध्यक्षतेखाली आमच्या 'श्री पूना मोढ वणिक समाज'चा सचिव म्हणून पाच वर्षं काम करताना अनेक दूरदर्शी, निर्णायक पावलं उचलली गेली त्यामुळं समाजाच्या वाटचालीला एक वेगळी दिशा मिळाली तसंच पाच वर्षांत राखीव निधी सोळा पटीनं वाढवताना त्यात अनेकांना सामील करून घेतलं.

वैयक्तिकरित्या मला आणि आमच्या कुटुंबियांना त्यांचा एक वडील बंधू म्हणून नेहमीच आधार आणि एक आदरयुक्त धाकही होता.

असो... असा हा 'ज्ञान हेच खरे ऐश्वर्य' या उक्तीला सार्थ करणारा, उमदा, परिपूर्ण व्यक्तीमत्त्वाचा माणूस तुमच्या-आमच्या सदैव स्मरणात राहील. त्यानं अधोरेखित केलेल्या मार्गावर चालत आपण त्याची स्वप्नं पूर्ण करणं हीच त्याला खरी आदरांजली ठरेल.

ॐ शांति शांति

## *Nomination Committee Election*

Due to Corona Nomination Committee Elections were held online for the first time. Rotary Club of Pune South is the first Club in India to successfully develop software to conduct the online voting abiding all the Club's bylaws. Confidentiality was the crux of this system. The results were declared within no time after the voting is closed.


Let's hear from Rtn. Abhijit Deshpande about how did it all happen.




Enjoy Watching....

The video shows the actual nomination system.

Enjoy Watching....





- अध्यक्ष सुदर्शन संवाद
- विविध विभाग संचालक किंवा कमिटी मुख्य संवाद
- क्लबमधील विविध प्रोजेक्ट्स, कार्यक्रम, फेलोशिप्स
- जावे त्यांच्या क्षेत्रा.../ मागील एखाद्या प्रोजेक्टची गोष्ट

तुमचा लेख आवर्जून द्या....
समन्वयक
आनंद / यामिनी

## क्लबकारी

# आपण 'ग्लोबल टू लोकल' कधी होणार?

**रो. विवेक वेलणकर**

ऐकण्यासाठी क्लीक करा...

गेल्या काही वर्षांपासून सोशल मिडियामुळं आपण सर्व जण ग्लोबल झालेलो आहोत. महाराष्ट्रात, देशात, जगभरात घडणाऱ्या घटनांवर आपण व्यक्त होत असतो. खरंतर आपल्या दैनंदिन जीवनाशी दुरूनही ज्या गोष्टींचा संबंध नाही त्यांवरही आपण हिरिरीनं व्यक्त होत असतो... किमानपक्षी फॉरवर्ड्र्समधून तर (त्याच्या खरेखोटेपणाची किंचितही खातरजमा न करता) अनेक विषयांमध्ये उडी घेत असतो. सुशांतसिंगपासून दीपिकापर्यंत आणि आयपीएलपासून अर्णवपर्यंत वेगवेगळ्या विषयांवर आपण किती वेळ आणि किती जीबी डेटा घालवला असेल याचा साधा हिशोबही लावणं शक्य नाही... मात्र आपल्या दैनंदिन आयुष्यातल्या गोष्टींशी थेट संबंध असणाऱ्या लोकल गोष्टींबद्दल आपण एकदम उदासीन का असतो हे कोडंच आहे.

आता बघा ना, आपल्या घराजवळच्या रस्त्यावरच्या फूटपाथवरचे उत्तम स्थितीत असलेले पेव्हर ब्लॉक्स जवळपास दरवर्षी बदलले जातात... पण देशातल्या भ्रष्टाचाराबाबत सोशल मिडियावर तावातावानं बोलणारे आपण 'जाऊ दे ना... मी कुठं या भानगडीत पडू...' या वृत्तीनं इथं एकदम शांत बसतो.

पुणे हे देशातलं पहिलं स्मार्ट शहर म्हणून घोषित होऊन पाच वर्षं होऊन गेली तरी अजून थोडा वारा, थोडा पाऊस आला की वीजपुरवठा बंद होतो, देखभालीच्या आणि दुरुस्तीच्या नावाखाली गुरुवारी हक्कानं वीजपुरवठा बंद करण्यात येतो. मुंबईपासून न्यूयॉर्कपर्यंत ग्लोबली कुठंच देखभालीसाठी आणि दुरुस्तीसाठी वीजपुरवठा बंद होत नसताना लोकली आपण ब्रही न काढता हे सहज मान्य करतो. जी गोष्ट विजेची तीच पाण्याची. देखभालीच्या आणि दुरुस्तीच्या नावाखाली महिन्यातून किमान एकदा तरी संपूर्ण शहराचा पाणीपुरवठा बंद ठेवण्यात येतो तेही आपल्या इतकं अंगवळणी पडलं आहे की, असं का हा प्रश्नसुध्दा आपल्याला पडत नाही.

काही दशकं शहरात राहूनही आणि महापालिकेचे सर्व कर इमानेइतबारे भरूनही आपण एनए टॅक्स नावाचा जिझिया कर का भरतो? हे डबल टॅक्सेशन नाही का हे प्रश्नसुध्दा आपल्याला पडत नाहीत.

जगभरातल्या रस्त्यांच्या कामांचे फोटो, टनेल्सचे फोटो, माहिती शेअर करण्यात आपण इतके गुंग झालो आहोत की, आपल्या शहरातून बाहेर जाणाऱ्या टोल रोडवरचे खड्डे, बरेचदा टोलनाक्यांवर वाया जाणारा पंधरा-वीस मिनिटांचा वेळ यांचा विचार करायलाही आपल्याला वेळ उरत नाही... मग निषेध ही फारच लांबची गोष्ट झाली.

आपल्या दैनंदिन जीवनातल्या या अशा गोष्टींची यादी करायला घेतली तर चार पानंसुद्धा खरंतर कमी पडतील... पण रात्रंदिवस अनावश्यक मेसेजेस फॉरवर्ड करण्यासाठी आणि ग्लोबल गोष्टींवर निष्फळ चर्चा करण्यासाठी आपण सोशल मिडियाचा जो वापर करतो त्यापेक्षा आपल्या दैनंदिन आयुष्याशी संबंधित गोष्टींसाठी आपण सोशल मिडियाचा वापर केला तर कदाचित परिस्थितीत सुधारणा होईल. प्रश्न आहे किमान यासाठी तरी आपण सोशल मिडियाचा वापर करणार का? राजकारण्यांपासून प्रशासनापर्यंत सर्वांना सोशल मिडियाच्या ताकदीचा पुरेपूर अनुभव आहे आणि इथं लागलेली आग किती वेगानं पसरते याचा त्यांना अंदाज आहे म्हणूनच आपण लोकल गोष्टींमध्ये नाही तर ग्लोबल गोष्टींमध्ये अडकावं अशी त्यांची इच्छा असते आणि आपणही या सापळ्यात अलगद अडकतो. आपण रोटेरिअन्स समाजातला एक जबाबदार घटक आहोत आणि आपण समाजासमोर अनेक चांगले आदर्श घालून देत असतो तेव्हा 'ग्लोबल टू लोकल' होण्यासाठीची ही चळवळ आपण सुरू केली तर समाज त्याचं नक्कीच अनुकरण करेल.


- सभासदांचा सहभाग वाढावा हा हेतू
- सभासदांच्या कलागुणांना वाव
- चित्रकला, फोटोग्राफी, कथा, लेख, कविता
- व्यक्तिगत, कौटुंबिक, व्यावसायिक गवसणी

तुमचा लेख आवर्जून द्या....
समन्वयक
आनंद कुलकर्णी / यामिनी पोंक्षे

**कलाकारी**

# कोड नेम गॉड – डॉ. मणी भौमीक

रो. डॉ. सुभाष देशपांडे




हजारो वर्षांपासून अनेक ज्ञानी व्यक्ती ईश्वराचा शोध घेण्याचा प्रयत्न करत आहेत जसे हिंदू संत, महंत, पाश्चात्य तत्त्वज्ञानी किंवा आधुनिक शास्त्रज्ञ. आईन्स्टाईन अथवा हॉकिन्स यांसारखे महान शास्त्रज्ञ जेव्हा शास्त्राच्या एका सीमेपर्यंत पोहोचले आणि त्याच्यापुढे काय आहे हे त्यांना सापडेना तेंव्हा त्या प्रश्नाचं उत्तर त्यांनी ईश्वरात शोधण्याचा प्रयत्न केला... पण तो ईश्वर त्यांना सापडला नाही म्हणून परत परत शास्त्राचा आधार घेऊन विश्वातली कोडी सोडवण्याचा त्यांनी प्रयत्न केला.

असाच प्रयत्न 'कोड नेम गॉड' या पुस्तकात डॉ.मणी भौमीक यांनी केला आहे. डॉ.भौमीक हे लेसर किरण या विषयातले जगप्रसिद्ध शास्त्रज्ञ आहेत. त्यांच्या एक्समर लेसर किरणांवरच्या महत्त्वाच्या संशोधनामुळं डोळ्यांसाठीची 'लॅसिक' ही शस्त्रक्रिया विकसित झाली. त्यांना पद्मश्री पुरस्कार देण्यात आला आहे. ते एक शास्त्रज्ञ आणि यशस्वी उद्योजक आहेत. या लेखाचा उद्देश डॉ.भौमीक यांची जीवनरेखा रेखाटण्याचा नसून शास्त्राच्या आधारे परमेश्वरापर्यंत पोहोचण्याच्या त्यांच्या प्रयत्नाचा आलेख रेखाटण्याचा आहे.

मणी भौमीक यांचा जन्म बंगालमधल्या तामलूक बंदराजवळच्या खेड्यात झाला. त्यांचे वडील शिक्षक होते. आईचं नाव लोलिता आणि आजीचं नाव शारदा. घरची परिस्थिती बेताचीच... घरात धार्मिक वातावरण होतं. त्यांचे वडील महात्मा गांधींबरोबर स्वातंत्र्यलढ्यात सामील झाले होते. लहानपणापासून मणी भौमीकना अवकाशाच्या अथांगपणाबद्दल कुतूहल होतं. वेदान्तात सांगितलेल्या 'ब्राह्मण' या एकमेव तत्त्वाविषयी त्यांना जिज्ञासा होती. मणी भौमीक यांच्यावर महात्मा गांधींच्या तत्त्वज्ञानाचा विशेष प्रभाव होता. १९४२–४३ साली पडलेल्या दुष्काळात भौमीक यांना उपासमार सहन करावी लागली. त्यांच्या आजीने तिच्या वाट्याचं अन्न मणींना दिलं आणि उपाशी राहून मरण पत्करलं. मणी जात्याच बुद्धिमान होते. त्यांनी शिक्षणाच्या साहाय्यानं गरिबीतून बाहेर पडण्याचा निर्धार केला. भारत सरकारनं दिलेल्या स्कॉलरशीपमुळं आयआयटीमधून पीएचडी करून गावकऱ्यांच्या मदतीनं १९५९ साली कॅलिफोर्निया युनिव्हर्सिटीत मणींनी प्रवेश मिळवला. भारतातल्या जात, जमात, जन्म, समाज यां शृंखलांतून बाहेर पडल्यावर भौमीक यांच्या कर्तृत्वाला बहर आला... तरीसुद्धा कातड्याच्या रंगावर तिकडे भेदभाव केला जायचा. गळेकापू स्पर्धेच्या ताणातून बाहेर येण्याकरता तिथं मणींनी ध्यानाचा आधार घेतला.

संपूर्ण पुस्तकात लेखकानं शास्त्राची आणि अध्यात्माची सांगड घालण्याचा प्रयत्न केला आहे. ईश्वर एकच आहे आणि तो अमूर्त आहे वास्तवात नाही असं त्यांचं मत होतं. ज्या प्रकारच्या अचूकतेनं विश्व चाललं आहे त्यामुळं असा विश्वास बसतो की, ते चालवलं जात आहे. विश्वातलं सर्व काही अणूंनी तयार झालं आहे. प्रोटॉन, न्यूट्रॉन आणि त्याभोवती फिरणारे इलेक्ट्रॉन यांपासून अणू तयार झाले आहेत. प्रोटॉन आणि न्यूट्रॉन हे क्वार्क्सपासून तयार झाले आहेत

म्हणजेच इलेक्ट्रॉन आणि क्वार्क्स हे मूळ कण (सब ॲटॉमीक पार्टिकल्स) आहेत. एखादा पदार्थ जरी घन वाटला तरी वास्तवात तो पदार्थ वरील कणांनी तयार झाला आहे. जे मूळ कण वास्तवात ऊर्जेचे (एनर्जी) क्वांटम आहे. हे क्वांटम वेगवेगळ्या फिल्ड्सनी आरक्षित आहेत, ही फिल्ड्स अमूर्त आहेत वास्तविक नाहीत उदाहरणार्थ, गुरुत्वाकर्षण क्षेत्र (ग्रॅव्हिटेशनल फिल्ड) जे आपल्याला सतत पृथ्वीवर ठेवतं. त्याचा आपल्याला सतत अनुभव येतो...पण ते आपल्याला प्रत्यक्ष दिसत नाही किंवा आपण त्याला स्पर्श करू शकत नाही. गुरुत्वाकर्षण क्षेत्र विश्वात पसरलेलं आहे. प्रत्येक फिल्ड हे महासागराप्रमाणे आहे. जसं महासागरांना निरनिराळी नावं आहेत... पण त्यांतलं पाणी एकच आहे आणि सर्वत्र सारखंच पसरलं आहे. त्याचप्रमाणे वर उल्लेख केलेले कण आणि त्यांचे गुणधर्म विश्वात सर्वत्र सारखेच आहेत. हे कण ऊर्जेशिवाय भासमान असतात. ऊर्जेमुळं ते प्रत्यक्षात येतात. हे कण दोन प्रकारचे असतात. एक प्रकार म्हणजे शक्तीचे कण (फोर्स) उदाहरणार्थ, गुरुत्वाकर्षण किंवा प्रकाश कण आणि दूसरा प्रकार म्हणजे पदार्थ कण (मॅटर) उदाहरणार्थ, क्वार्क किंवा इलेक्ट्रॉन. या निरनिराळ्या कणांची स्वतंत्र क्षेत्रं असतात.

विश्वात चार प्रकाराच्या शक्ती आहेत. १) गुरुत्वाकर्षण २) विद्युत चुंबकीय ३) शक्तिशाली आण्विक शक्ती ४) कमकुवत आण्विक शक्ती. या वेगवेगळया शक्ती विश्वात समभावानं कार्य करत असतात. त्यांच्यात थोडासा जरी विसंवाद झाला तरी विश्व टिकणार नाही. उदाहरणार्थ, जर शक्तीशाली आण्विक शक्तीपेक्षा (स्ट्राँग न्युक्लिअर फोर्स) गुरुत्वाकर्षण ताकदवान असतं तर गुरुत्वाकर्षणीय प्रभावाखाली सर्व अणूरेणू एकमेकांत मिसळले असते आणि विश्व तयार झालं नसतं.

हे असं होणं, न होणं यांतील फरक अत्यंत सूक्ष्म आहे. सर्व शास्त्रज्ञ या शक्तींमधले हे सुक्ष्म धागे कसे जुळून आले, हे शोधण्यात गुंतले आहेत. विश्वाच्या सुरुवातीला या चारही शक्ती एकत्र होत्या आणि यांच्यात योग्य समतोल होता. नंतर हळूहळू त्या वेगळ्या झाल्या. असं सिद्ध झालं आहे की, त्या चारही शक्ती अतिसूक्ष्म अंतरांवर एकाच पातळीवर असतात. याचा अर्थ असाही असू शकतो की, त्या चारही शक्तिंचा उगम एकच आहे. जरी ऊर्जेला वेगवेगळी नावं दिली असली उदाहरणार्थ, विद्युत, यांत्रिक, रासायनिक, औष्णिक आणि प्रकाश तरी ऊर्जा एकच आहे. तसंच जरी चारही शक्तींना निरनिराळी नावं दिली असली उदाहरणार्थ, गुरूत्वाकर्षण, विद्युत चुंबकीय, शक्तीशाली आण्विक आणि कमकुवत आण्विक तरी त्या शक्ती एकच आहेत आणि त्यांचा उगमसुद्धा एकच आहे त्यामुळं या सर्व शक्तींची आणि ऊर्जांची क्षेत्रंसुद्धा एकच आहेत. हे सामाईक उगमस्थान (प्रायमरी फिल्ड) कुठं असू शकेल?

अंतराळात असेल का? ऊर्जेचं आणि शक्तीचं एकत्रीकरण जसं अतिउष्ण अवस्थेत होतं तसंच ते अतिसूक्ष्म अंतरावरसुद्धा होऊ शकतं. अंतराळ हे अवकाशाचं काळाशी गुंफलेलं वीणकाम आहे. त्या वीणकामाच्या अतिसूक्ष्म अंतरात हे उगमस्थान गुंतलेलं असू शकतं त्या वीणकामाच्या प्रत्येक धाग्याधाग्यांत असू शकतं त्याचप्रमाणे ही शक्ती प्रत्येक कणाकणांत, प्रत्येक अणूत, प्रत्येक पेशीत, प्रत्येक शरीरात असू शकते त्यामुळं आपण या सर्व समावेशक शक्तीचा एक भाग नसून प्रत्यक्ष शक्तीच असू शकतो जसं आपले अवयव केवळ शरीराचा भाग नसून शरीरच आहेत. आपले विश्व ऊर्जेच्या अतिसूक्ष्म बिंदुंच्या प्रसरण पावण्यामुळं तयार झालं. हे प्रसरण इतकं अचूक आहे की, थोडंसं इकडंतिकडं झालं असतं तर विश्व आकुंचन पावलं असतं किंवा अनंतापर्यंत प्रसरण पावलं असतं. विश्वाच्या सुरुवातीपासूनच विश्वात परिस्थिती अशी अनुकूल होती की, विश्वात बुद्धिमान जीवन तयार झालं. त्याप्रमाणेच विश्वात नैसर्गिक नियम असे तयार झाले आहेत की, बुद्धिमान जीवाला सहज कळतील म्हणजेच विश्वाला कदाचित पूर्वकल्पना


असू शकते की, भविष्यात विश्वात बुद्धिमान जीवन निर्माण होईल. याला 'वीक ॲन्थ्रॉपीक प्रिन्सिपल' असं म्हणतात. पाखंडी विचारतील की, तेराशे कोटी प्रकाशवर्षं एवढा पसारा असलेलं हे विश्व एका वाळूच्या कणाएवढ्या पृथ्वीवरच्या बुद्धिजीवी माणसाकरताच तयार करण्यात आलं का? यावर भौमीकनी उत्तर दिलं आहे की, विश्वाचा पसारा महत्त्वाचा नसून जीवन तयार होण्यास लागणाऱ्या वेळेत विश्व आकुंचन पावून कोसळू नये म्हणून त्याचं प्रसरण पावणं महत्त्वाचं आहे. जीवनाकरता लागणारी मूलद्रव्यं तयार होण्यास शेकडो कोटी वर्षं लागली. तोपर्यंत विश्व टिकायला पाहिजे. विश्वात जीवन अनेक ठिकाणी असण्याची शक्यता आहे त्यामुळं विश्व ज्या मूळ तत्त्वानुसार तयार झालं आहे आणि चाललं आहे त्या मूळ तत्त्वात, विचारशक्तीचा पण समावेश आहे. विश्व विचारपूर्वक तयार झालं आहे असं 'वीक ॲन्थ्रॉपीक प्रिन्सिपल' सांगतं. क्वांटम् मेकॅनिकस् या सिद्धांतात एन्टँगलमेंट म्हणून एक तत्त्व आहे. सारख्याच गुणधर्मांचे दोन कण एकमेकांपासून कितीही दूर असले तरी एकमेकांना जोडलेले असतात. एका कणावर होणारा परिणाम अथवा बदल लगेच दुसऱ्या कणावर जाणवतो. त्याचप्रमाणं मन, विचारशक्ती, आत्मा या गोष्टीसुद्धा परमात्म्याशी (मूळक्षेत्र) अशाच जोडल्या गेलेल्या आहेत. आत्मा आणि परमात्मा यांचं उगमस्थान एकच आहे.

विचारशक्ती फक्त मेंदूपुरती मर्यादित नसून ती अतीन्द्रिय अथवा पारलौकिक आहे. उदाहरणार्थ, आपल्याला कुणाची तरी आठवण येते आणि ती व्यक्ती आपल्या समोर येते किंवा कुणीतरी आपल्याला आपल्या पाठीमागून टक लावून बघत असतं आणि आपली त्या व्यक्तीशी नजरानजर होते. विश्वाच्या सुरुवातीला जेव्हा अवकाशही तयार झालं नव्हतं म्हणजेच अवकाशपूर्व स्थितीत सर्व शक्ती, सर्व ऊर्जाक्षेत्रं एकत्र होती आणि सगळं विश्व एकसंध होतं. त्याचबरोबर विचारशक्ती आणि मूळक्षेत्रंसुद्धा (ज्या क्षेत्रापासून इतर क्षेत्रं तयार झाली उदाहरणार्थ, गुरूत्वाकर्षण इत्यादी) एकत्र होती त्यामुळं विचारशक्ती आणि मूळक्षेत्रसुद्धा एकाच उगमस्थानापासून उगम पावली असणार. या एकत्रित, एकसंध, अवकाशपूर्व विश्वात एक सुक्ष्म हालचाल (क्वांटम फ्लक्च्युएशन्स) झाली आणि त्यामुळं ही एकसंधता मोडली गेली आणि विश्व तयार झालं. जरी एकत्रित असलेली क्षेत्रं वेगळी झाली तरीपण त्या एकसंधतेच्या खुणा आजसुद्धा अस्तित्वात असतील. हे एकत्रीकरण अतिउष्ण तापमानात झालं होतं जे आज अस्तित्वात नाही... पण अतिसूक्ष्म (प्लँक) अंतरात पदार्थ विज्ञानाचे नियम अतिउष्ण वातावरणासारखेच असतात. जर या एकसंधतेमुळं विचारशक्ती आणि मूळक्षेत्र (प्रायमरी फिल्ड) एकत्र असतील आणि ती एकमेव उगमस्थानाशी (वन सोअर्स) निगडित असतील तर विश्व जागृत असणार अशा जागृत उगमस्थानाचं सांकेतिक नाव (कोड नेम) विश्वेश्वर होय. अशा जागृत विश्वेश्वराशी निगडित होण्यास ध्यानसाधनेसारखा दुसरा मार्ग नाही. मणी भौमीकना खरोखरच ईश्वर मिळाला का? ईश्वराचा शोध घेताना ते अगदी उंबरठ्यावर पोहोचले पण पलीकडं गेले का? ईश्वर सर्व समावेशक आहे याचा अर्थ विश्वातल्या सर्व गोष्टी ईश्वरच आहेत नुसते ईश्वराचा भाग नाहीत जसे आपले अवयव ते शरीराचा भाग नसून प्रत्यक्ष शरीरच आहेत. हरवलेल्या, समोर न दिसणाऱ्या किंवा आपल्याजवळ नसणाऱ्या गोष्टींचा शोध घेतला जातो... पण जर आपणच ईश्वर आहोत तर शोध कोणाचा घ्यायचा आणि कशासाठी? विश्वेश्वरानं जे विश्व तयार केलं ते फक्त मानवासाठीच आहे का? इतर जिवांत विचारशक्ती नसते? सध्या आपण विषाणूंच्या विचारशक्तीचे दुष्परिणाम भोगत आहोत.

मणी भौमीक अजुनही ईश्वराच्या शोधात आहेत. त्याकरता त्यांनी ध्यानसाधनेचा मार्ग पत्करला आहे. हजारो वर्षं मानव ईश्वराच्या शोधात आहे आणि पुढंसुद्धा राहणार आहे. त्याला ईश्वर कधीच न मिळो... कारण एकदा का त्याला ईश्वर मिळाला की त्याचं ईश्वराबद्दलचं कुतूहल कमी होईल आणि तो असुर शोधण्याचा प्रयत्न करेल.

## गदिमा

**रो. सुधांशु गोरे**




मी आज ज्या पुस्तकाबाबत लिहिणार आहे ते फारसं प्रसिद्ध नसलेलं परंतु महत्वाच्या विषयाशी जोडलेलं असं पुस्तक आहे. मराठी रसिकांमध्ये गदिमा अर्थात गजानन दिगंबर माडगूळकर यांचं नाव महिती नाही अशी व्यक्ती सापडणे कठीण आहे किंबहुना अशक्यच आहे.. त्यांना आपण मराठीचे वाल्मिकी किंवा महाकवी अशा आदरयुक्त संज्ञांनी संबोधत असतो कारण त्यांचे नाव उच्चारल्यावर डोळ्यासमोर प्रथम येते ते गीत रामायण.. त्यानतंर आठवतात त्यांची शेकडो भावगीते आणि चित्रपटगीते. काही कारणाने दुर्लुक्षित राहिलेलं त्यांचं वैशिष्ट्य म्हणजे लघुकथा लेखन.. तसं पाहिलं तर त्यांचे बारा काव्यसंग्रह, आठ कादंबया, दोन नाटकं, दोन आत्मवृत्तं, १५७ मराठी आणि २३ हिंदी चित्रपटांच्या पटकथा हे प्रसिद्ध झालेलं साहित्य आहे ..काही अप्रसिद्ध म्हणजे त्यांचे १३ कथासंग्रह प्रकाशित झाले.. कथाकार गदिमा यांना प्रकाशात आणण्याचे काम त्यांच्या रसिक अनुयायांनी मनावर घेतलं आणि त्यातलं पहिलं प्रकाशन मी आज तुमच्या समोर सादर करणार आहे.

गदिमांचा जन्म १ ऑटोबर १९१९ चा व मृत्यू १४ डिसेंबर १९७७ मध्ये.. २०१९ मध्ये माडगूळकर कुटुंबीय आणि त्यांचे स्नेही यांनी मिळून गदिमांची जन्मशताब्दी विविध पद्धतींनी साजरी करायची असं ठरवलं, त्याचाच एक भाग म्हणजे हे भाषांतर होय.. प्राध्यापक सौभाग्यवती विनया बापट या इंग्रजी विषयाच्या ख्यातनाम शिक्षिका आहेत..गदिमांच्या शताब्दी निमित्ताने त्यांच्या निवडक कथांचे इंग्रजी भाषांतर करावे अशी कल्पना बापट बाईच्या मनात आली.. तिला मूर्त रूप देण्यासाठी त्या कामाला लागल्या आणि त्यातून साकार झाले ''सिलेक्ट शॉर्ट स्टोरीज ऑफ जी.डी.. माडगूळकर'' हे भाषांतर पुस्तक..

प्रा. सौ.. विनया बापट यांना शाळेत असतानापासूनच इंग्रजी भाषेबद्दल ओढ निर्माण झाली.. बारावी इयत्ता उत्तीर्ण होताना इंग्रजी विषयात त्यांनी प्रथम क्रमांक मिळवला आहे.. नंतर बीए आणि एमए या दोन्ही पदव्या इंग्रजी विषय घेऊनच त्यांनी प्रथम श्रेणीत प्राप्त केल्यात. त्यानंतर एम फिल याच विषयात अ दर्जा मिळवून प्राप्त केले.. १९९१ ते २००७ या काळात विविध महाविद्यालये आणि पुणे विद्यापीठ या संस्थेत त्यांनी इंग्रजीच्या अध्यापिका म्हणून काम केले.. सन २००० पासनू बापट अकॅडमी मध्ये अध्यापिका म्हणून काम करतात..

लघुकथा हा वाङ्मयाचा एक लवचिक असा आकृतिबंध आहे. लवचिक अशा अर्थाने की याची एकच निश्चित अशी व्याख्या करता येत नाही.. साधारणतः असं म्हटलं जातं, 'जी कथा एका बैठकीमध्ये वाचून पूर्ण होते, म्हणजे एक निश्चित काहीतरी वाचल्याचं समाधान किंवा जाणीव ही या बैठकीमध्ये होते तेंव्हा त्या लिखाणाला लघुकथा असं म्हटलं जातं..' शब्दसंख्येचा विचार केला तर साधारणत: लघुकथा हजार शब्दांपेक्षा लहान नसतात परंतु दोन हजार शब्दांपेक्षा मोठ्या क्वचितच असतात.. अर्थात हा काही नियम असा नाही.. काही लेखकांच्या मताने लघुकथेमध्ये एक निश्चित असं कथानक असलं पाहिजे म्हणजे एखादी घटना ही तिच्या केंद्रस्थानी असते आणि त्या घटनेच्या अगोदर आणि नंतर घडणा-या, त्यासंबंधित पात्रांच्या कृती आणि त्यांच्या भावना यांची एक प्रकारची गुंफण

असं लघुकथेला म्हणता येईल.. यात महत्वाची गोष्ट अशी आहे की त्या घटनेच्या माध्यमातून लेखकाला काहीतरी आपल्या अनुभवाचं सार मांडता आलं पाहिजे म्हणजे असं की पुणे स्टेशनवरून डेक्कन क्वीन सुटली आणि ती अमुक ठिकाणी थांबली तमुक ठिकाणी थांबली असं नुसतंच वर्णन मुंबईपर्यंतचे केलं तर ती लघुकथा ठरत नाही, प्रवासवर्णनही ठरत नाही कारण त्यातून लेखकाला नेमकं काय सांगायचं आहे ते कळत नाही, कळणार नाही.. असो, लघुकथेची एक व्याख्या अशीही केलेली आहे की, 'ज्याला स्पष्ट सुरुवात नाही आणि स्पष्ट शेवट नाही असा अनुभवाचा एक तुकडा'; असो.. तर गदिमांच्या लघुकथांचे तेरा संग्रह प्रसिद्ध झालेले आहेत..

आता भाषांतराविषयी थोडंसं.. भाषांतर हा शब्द जितका साधासोपा वाटतो तितकं सहजपणे ते काम सोपे नाही. भाषांतराचा सगळ्यात सोपा प्रकार म्हणजे शब्दशः भाषांतर, दोन्ही भाषांचे शब्दकोश घेऊन बसल्यानंतर हे काम सोपे होऊ शकते पण अर्थातच ते निश्चितपणे कनिष्ठ मानले जाते.. पुलंनी याचं एक फार छान उदाहरण दिलेलं आहे.. एका अशाच भाषांतरकाराने 'ट्रॅफिक जॅम' चे 'वाहतूकीचा मुरंबा' असे शब्दशः भाषांतर केलं.. शदकोश बघून केलेले भाषांतर अर्थातच हास्यास्पद ठरते.. कधीकधी त्यातून भयंकर अर्थही निघू शकतात.. असो.. भाषांतराचे दुसरे टोक म्हणजे शब्दशः भाषांतरापासून दूर म्हणजे स्वैर अनुवाद किंवा स्वैर रूपांतर किंवा स्वैर भाषांतर.. त्यामध्ये मूळ लेखकाला जे म्हणायचं आहे असं भाषांतरकाराला वाटतं ते भाषांतरकार नव्या भाषेच्या एकूण संस्कृतीमध्ये त्याला ज्या पद्धतीने बसवावे असं वाटतं त्या पद्धतीने बसवून वाचकाला ते सादर करतो. या दोहोंच्या मध्ये कुठेतरी असणारी भाषांतरे आपल्याला अनेक मिळतात.. यात भाषांतराला वाचक हा अभिप्रेत आहेच..

केवळ लेखन करणारा आपल्या सृजनशीलतेला वाव देत असतो परंतु भाषांतरकार मूळ लिखाणाच्या भाषेपेक्षा वेगळ्या भाषेतल्या वाचकांसाठी लिहीत असतो; तेंव्हा या सगळ्या गोष्टी पार्श्वभूमीला ठेवून आपल्याला आता त्या भाषांतराकडे पहायचं आहे.. भाषांतर करताना काही अडचणी निश्चित येतात.. एक म्हणजे एखाद्या स्थानिक भाषेतल्या शब्दाचा सांस्कृतिक आणि ऐतिहासिक शब्दप्रयोग दुस-या भाषेमध्ये तसेच्या तसे करणे अवघड असतं.. उदाहरणार्थ पुलं नी ''कात्रज करणे'' असा एक शब्दप्रयोग रूढ केला.. त्याचा अर्थ समजण्यासाठी शिवाजी महाराजांच्या चरित्राचे पूर्ण ज्ञान असणे आवश्यक आहे.. महाराजांनी कात्रजच्या डोंगरावर शत्रुसैन्याला जायला भाग पाडले आणि स्वतः दुस-याच दिशेने पसार झाले हा या शब्दप्रयोगाचा अर्थ आहे.. मराठीच बोलणा-या परंतु महाराजांचा चरित्रतपशील माहित नसलेल्या व्यक्तीला सुद्धा कात्रज करणे या शब्दप्रयोगाचा अर्थ कळणार नाही.. ज्या भाषेमध्ये त्याचं भाषांतर करायचं आहे त्या भाषेत तर समांतर शब्दप्रयोग सापडण्याची शक्यता फारच थोडी असेल अशा वेळेला भाषांतरकाराचं कौशल्य पणाला लागतं.. तशीच अडचण प्रादेशिक, भौगोलिक वैशिष्ट्ये यांच्या बाबतीत निर्माण होऊ शकते.. उदाहरणार्थ, कोकणातली माणसं, ''तिकडे देशावर'' असं ज्यावेळी म्हणतात त्यावेळी ''सह्याद्री चढून गेल्यानंतर लागणारा भूभाग'' असा अर्थ अभिप्रेत असतो; तर या अडचणींसह भाषांतर करायचं म्हणजे भाषांतरकाराच्या सर्जनशीलतेला एखाद्या लेखकाएवढेच आव्हान असते आणि त्यामुळे तेवढे महत्व दिलेच पाहिजे..

आता त्या पुस्तकाकडे वळू या.. त्यामध्ये १४ कथा आहेत त्यापैकी तीन व्यकतिचित्रे आहेत, नेम्या, वेडा पारिजात आणि औंधाचा राजा; पाच कथा या कलाटणी कथा असे मी मानतो; आपल्यापैकी बहुतेकांनी सॉमरसेट मॉम, किंवा आल्फ्रेड हिचकॉक वाचला असेल, एडगर अँलन पो वाचला असेल त्यांना कल्पना आहे की कलाटणी कथा म्हणजे काय; दोन कथा घटना कथा आहेत, इतर कथांना विशिष्ट वर्गात टाकता येत नाही, आणि एक स्थळवर्णन आहे.. आशयाच्या दृष्टीने विचार केला तर मूळ लेखकाच्या विविध आणि समृद्ध जीवनानुभवाचे दर्शन या कथांमधून घडायला मदत होते असं म्हणता येईल.. प्रथम मी गदिमांच्या कथांची, भाषेची काही वैशिष्ट्ये उलगडून दाखवू इच्छितो आणि त्यानंतर प्रस्तुत भाषांतर त्या सर्व साहित्यिक वैशिष्ट्यांना कितपत संभाळून आहे याचा विचार मांडेन..

या चौदा कथांपैकी गदिमांच्या बहुतेक कथा या कोल्हापुर-सातारा आणि माण तालुका यांच्या पार्श्वभूमीवर घडतात.. काही कथांमध्ये पुण्याचा, मुंबईचा संदर्भ येतो परंतु मुख्यत्वाने कोल्हापुर-सातारा हा कथांचा संदर्भ आहे

बहुतांश कथांमध्ये ग्रामीण पार्श्वभूमी आहे, समाजातल्या जातींच्या आधाराने आणि आर्थिक आधाराने झालेल्या वेगवेगळ्या स्तरांचा यामध्ये समावेश आहे; कथांमधील पात्रे विविध पातळ्यांचे प्रतिनिधित्व करतात त्यामुळे त्यांच्या भाषेची वैशिष्ट्ये हे या कथांचं एक बलस्थान आहे.. ग्रामीण लोकांच्या बोलण्यामध्ये नेमकेपणा, थोडकेपणा आणि विचारलेल्याला उत्तर एवढेच सापडते.. अघळपघळ, मुद्याला धरून इतर बाबी या क्वचितच आढळतात.. गदिमांनी ते नेमकं सांभाळलं आहे.. त्यांची पात्रं आपापल्या पार्श्वभूमीचं भान राखून शब्दप्रयोग करतात, वाक्प्रचार वापरतात एवढेच नाही तर वाक्याची सुरुवात नामाने किंवा नावाने संबोधून करण्याची ग्रामीण भागातली लकब गदिमांनी नेमकी उचलली आहे .

मराठी संस्कृतीची जाण असणाऱ्या आणि १९३० ते १९६० हा काळ डोळ्यांसमोर असणा-या व्यक्तीला केवळ ते संवाद वाचून एखादे पात्र नेमके काय आहे, म्हणजे स्त्री आहे की पुरुष आहे, शेतकरी आहे की सावकार आहे, तरुण आहे की वयस्कर आहे, गरीब आहे की श्रीमंत आहे, याचा अंदाज लावणे शक्य होते.. आणि हे वैशिष्ट्य लिखाणाला उंचीवर नेऊन ठेवते.. भाषांतर करण्याच्या दृष्टीने हे आव्हानच असते.. गदिमांचे दुसरे वैशिष्ट्य म्हणजे ते फार भाषिक अलंकारांच्या मागे लागत नाहीत, उपमा उत्प्रेक्षा वगैरेच्या भानगडीत न पडता जे जसे समोर दिसते ते तसेच शब्दांतून मांडणे हे गदिमांच्या भाषेचं एक महत्वाचं वैशिष्ट्य आहे असं म्हणायला हरकत नाही.. आणखी एक वैशिष्ट्य असे म्हणता येईल की त्यांची वाक्यरचना सोपी, सरळ, सुटसुटीत अशी आहे . त्यांची पात्रं ग्रामीण, कमी शिकलेली किंवा निरक्षर असली तरी जीवनात आलेल्या अनुभवांचं शब्दांमध्ये सार मांडणं हे मात्र त्यांना चांगलं जमतं आणि यामुळेच उगीच मोठाली वाक्ये, भारदस्त शब्दरचना वगैरे टाळून प्रवाही भाषेतून आणि डोक्याला फारसा ताप न देता गदिमांच्या कथा पुढे सरकत राहतात.. साधारणत: लघुकथा या जश्या घडल्या तश्या मांडण्याची पद्धत आहे, कथानकात मागेपुढे कोलांट्या (फ्लॅशबॅक) अश्या सहसा नसतात तेही गदिमांच्या कथांचं एक वैशिष्ट्य म्हणायला हरकत नाही.. मात्र असं असूनही वाचकाची उत्कंठा कायम राखण्यामध्ये गदिमा यशस्वी होतात..

राम गणेश गडकरींसारखी पल्लेदार वाक्ये नाहीत, आचार्य अत्र्यांसारख्या अतिरेकी उपमा नाहीत किंवा ना.. सी.. फडक्यांसारखी विशेषणांची लयलूट नाही त्यामुळेच गदिमांच्या या कथा मराठी वाचकाला आपल्या रोजच्या भेटणा-या, आसपासच्या लोकांच्या आयुष्यात घडल्यासारख्या वाटतात यात नवल नाही..

टीप – प्रा. सौ..विनया बापट आपले रोटेरियन विसुभाऊ गोडबोले यांची सुकन्या आहेत..


- **सभासदांचा वेगवेगळ्या विषयांवरचे दृष्टिकोन मांडण्याची जागा...**
- **हलकंफुलकं लेखन हवं**
- **पुस्तंक, नाटक, चित्रपट, मालिका, वेबसिरीज**
- **राजकारण, समाजकारण, चालू घडामोडी**

**दृष्टिकोन**

**तुमचा लेख आवर्जून द्या...**
**समन्वयक**
**योगेंद्र नातू / अभिजित देशपांडे**

# Donations - January 2021

**Thank you all of you!**

## Godaan Project - Part 2

| Sr. No. | Name | Amount in Rupees |
|---|---|---|
| 1 | Mr. Padmakar and Mrs.Vasanti Jere | 25,000 |
| 2 | Ann Sai Paranjape | 16,000 |
| 3 | Rtn. Sudarshan Natu | 5,000 |
| 4 | Mr. Milind Joshi | 11,001 |
| 5 | Mr. Bhaskar Bhole | 16,000 |
| 6 | Prof. Sharad Sane | 12,000 |
| 7 | Mr. Madhusudan Sahasrabudhe | 14,000 |
| 8 | Rtn. Ravindra Prabhune | 16,000 |

## Foundation Donations

| Sr. No. | Name | Amount in Dollars |
|---|---|---|
| 1 | Rtn Sudarshan Natu | 2,000 |
| 2 | Rtn Atul Atre | 200 |
| 3 | Rtn. Abhijit Deshpande | 100 |
| 4 | Rtn. Sanjeev Ogale | 1,000 |
| 5 | Ann Sneha Ogale | 1,000 |

## Other Donations

| Sr. No. | Name | Amount in Rupees |
|---|---|---|
| 1 | Mr. Subhash Chauthai | 7,500 |

## स्वरदीप दिवाळी पहाट

रो. अभिजित देशपांडे आणि ॲन माधवी देशपांडे यांचे सुपुत्र आदित्य याने आपल्या शाळेतल्या कलाकार मित्रांसोबत 'स्वरदीप दिवाळी पहाट' हा एक उत्तम कार्यक्रम ऑनलाइन सादर केला. या कार्यक्रमात त्यांनी शास्त्रीय संगीत, सुगम संगीत तसंच नाट्यसंगीत हे गायनाचे प्रकार सादर केले. आदित्य गिटार, हार्मोनियम आणि सतार ही तीनही वाद्यं उत्तम वाजवतो तसंच गातोसुद्धा.... हे सर्व बाल शिक्षण मंदिर शाळेचे विद्यार्थी आहेत. त्यांनी आपल्या गुरुजनांना हा कार्यक्रम अर्पण केला आहे. या छोट्या कलाकारांनीच या कार्यक्रमाची संकल्पना, नियोजन आणि सादरीकरण करून आपल्या कार्यक्रमानं दिवाळीची उत्तम सुरुवात केली.






व्हिडिओ इथे पाहा...

- शुभेच्छा
- स्मृती
- गवसणी
- या महिन्यात मागच्या वर्षांत...

**विशेष**

तुमचा लेख आवर्जून द्या...
समन्वयक
श्वेता करंदीकर

## टीम बुलेटिन

**सदरं**

- मुखपृष्ठ ..........................श्वेता.............. विधानं/ कोट्स
- संपादकीय/ अध्यक्षीय........योगेश /सुदर्शन
- रोटरी..........................योगेंद्र / अभिजित............... रोटरी मंच/RI
- डिस्ट्रिक कनेक्ट...........योगेंद्र / अभिजित........ डिस्ट्रिक घडामोडी
- क्लबकारी.........................आनंद / यामिनी..........क्लब घडामोडी
- कलाकारी.........................आनंद / यामिनी..........सभासद गुणदर्शन
- दृष्टीकोन.......................योगेंद्र / अभिजित..........पुस्तक, चित्रपट इ.
- विशेष.............................श्वेता....................शुभेच्छा, स्मृती

- क्रिएटिव्ह असिस्टन्स आणि कोऑर्डिनेशन..........टीम सहयोगी